# विस्तार केंद्रांवरील वर्षान्त समारंभ

- वर्षारंभ आणि वर्षान्त हे वैदिक काळातील कार्यक्रम आहेत.
- वर्षातील सहा महिने वेदांचा अभ्यास सुरू करायचा दिवस म्हणजे वर्षारंभ.
- वेदांचा अभ्यास थांबवून सहा महिने वेदांचा व्यवहारात उपयोग करण्यासाठी आवश्यक ज्योतिष, व्याकरण, इत्यादी वेदांगांचा अभ्यास सुरू करायचा दिवस म्हणजे वर्षान्त.
- चालू भाषेत म्हणायचे झाले तर वर्षारंभ पासून सहा महिने तात्त्विक (थिअरीचा) अभ्यास करायचा. वर्षान्ताला तात्त्विक अभ्यास थांबवून प्रात्यक्षिकाचा (प्रॅक्टिकलचा) अभ्यास सुरू करायचा. अशी पूर्वीची रीत होती.
- प्रबोधिनीत आपण या दोन कार्यक्रमांचे पुनरुज्जीवन केले.

  वर्षारंभापासून वर्षान्तापर्यंत 'प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया' हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी स्वतःच्या क्षमता, ज्ञान व कौशल्ये वाढविण्यासाठी झटायचे.
- वर्षान्तापासून वर्षारंभापर्यंत 'समर्थ मायभूमिला जगी करावया' हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून त्या साठीचे विविध मार्ग वापरणाऱ्यांच्या जवळ जायचे, त्यांचे काम समजून घ्यायचे, स्वतः थोडे करून पाहायचे.
- विद्यार्थी-दशेत असलेल्यांकरिता अशी विभागणी करणे सोपे असते. प्रौढांना वर्षाची अशी दोन भागात विभागणी करणे अवघड जाते. त्यांनी वर्षरिंभ व वर्षान्ताची उपासना करताना जमेल तेवढे विद्यार्थ्यांच्या भूमिकेत जाण्याचा प्रयत्न करायचा असतो. म्हणजे दरवर्षी काहीतरी नवीन शिकायचा आणि नव्याने शिकलेले वापरून पाहण्याचा प्रयत्न करायचा असतो.
- परंतु प्रौढ सदस्यांना वर्षरिंभ आणि वर्षान्त या वर्षातल्या दोन दिवसांकडे आणखी थोड्या वेगळ्या दृष्टीनेही बघता येईल.
- वर्षारंभ हा आपली व्रते, प्रतिज्ञा, संकल्प यांची आठवण आणि उजळणी करण्याचा दिवस असतो. नवे कार्यसंकल्प करण्याचा दिवस असतो.
- वर्षान्ताचा दिवस हा आधीच्या वर्षान्तापासूनचा आढावा घेण्याचा, वर्षभरातील अनुकूल-प्रतिकूल घटनांचा आपल्या मनावरील परिणामांचा वेध घेण्याचा, वर्षभरात मनात रुजलेल्या नव्या कल्पनांचे स्वागत करण्याचा आणि मनात रेंगाळणारे कडू अनुभव काढून टाकण्याचा दिवस असतो. या साठी वर्षान्त उपासनेला जोडून अर्धा ते एक तास सगळ्यांनी आपले मनोगत लिहिण्याचा उपयोग होतो.
- विद्यार्थी आणि प्रौढ सदस्य सर्वांनीच वर्षान्ताच्या दिवशी वर्षान्ताची पोथी आणखी समजून घेतल्याचा उपयोग होतो. वर्षारंभ आणि वर्षान्त समारंभाच्या पोथील गद्यातील प्रार्थना एकच आहे. दोन्ही दिवशी त्यातील वेगवेगळ्या भागांवर भर द्यावा.
- त्यापूर्वी वर्षान्ताच्या पोथीची रचना समजून घेतल्याचा उपयोग होईल ह्नह्न

  १) पहिला भाग सरस्वती स्तवनाच्या एका श्लोकाचा आहे. आमच्यातील जाड्य म्हणजे जडता म्हणजे अज्ञान, निःशेष म्हणजे पूर्णपणे, जावो या साठी ती प्रार्थना आहे.

२) दुसरा भाग 'ईशावास्यम् इदं सर्वं....' पासून 'एकं सत् विप्राः ....' पर्यंतच्या पाच मंत्रांचा आहे. हे जग कसे आहे याबद्दलचे तत्त्वज्ञान त्यात आहे. वर्षानुवर्षे हे मंत्र म्हणत राहिले की हळू हळू त्यांचा अर्थ समजू लागतो. काय समजून घ्यायचे आहे त्याची आठवण राहावी म्हणून दरवर्षी यांचा उच्चार करायची पद्धत होती. ती आपण पुन्हा सुरू केली आहे.

३) तिसरा भाग 'कुर्वन् एव इह कर्मणि ....' पासून 'विद्यां च अविद्यां च ....' पर्यंत तीन मंत्रांचा आहे. कसे जगले म्हणजे दुसऱ्या भागातील तत्त्वज्ञानाचा अर्थ समजायला सोपे जाते हे यात सांगितले आहे. या मंत्रांमध्येही 'अदीनास्याम शरदः शतम्' ह्न 'आम्ही शंभर वर्षे आत्मविश्वासाने जगू' या पासून जगायला सुरुवात करायची असते. हे स्वतःला पुन्हा पुन्हा बजावावे लागते. म्हणून वर्षान्ताला दरवर्षी त्याचा उच्चार करायची पद्धत सुरू केली आहे.

४) चौथा भाग 'श्रीः वै राष्ट्रम्....' पासून 'यानि अस्माकं सुचरितानि ....' पर्यंत दहा छोट्या छोट्या मंत्रांचा आहे. आपले व्यक्तिगत आयुष्य आपल्या समाजाच्या जीवनाशी जोडलेले आहे याची आठवण देणारे हे मंत्र आहेत. प्रत्येक जण स्वतःच्या आणि समाजाच्या जीवनाला कसे वर नेऊ शकतो हे या मंत्रांमध्ये सांगितले आहे. या भागाचा शेवट ज्या मराठी वाक्याने होतो ते या भागाचे सार आहे ह्न 'अंती हे राष्ट्र वैभवसंपन्न, पौरुषसंपन्न, संघटनायुक्त आणि म्हणून प्रगतिपथापासून कधीही खाली न येणारे, विजयसंपन्न, एकात्म असे होऊ दे.'

५) पाचव्या भागात एकच अभंग आहे. हरिभजन आणि ज्ञानार्जन या दोन कृती हीच आपली ओळख बनावी असे या अभंगाचे सार आहे. या साठी अ) वरवरच्या गोष्टींना भुलून जाऊ नये, आ) निष्कारण आपली मते ज्याला त्याला सांगत बसू नये, इ) आधी अनुभव घेऊन मत बनवावे, इतरांनी केलेल्या प्रचारात वाहवत जाऊ नये आणि ई) अखंड सावधान असावे या चार गोष्टी या अभंगाच्या चार कडव्यांमध्ये सांगितल्या आहेत.

६) वर्षान्त उपासनेचा सहावा भाग गद्य प्रार्थनेचा आहे. पाचव्या भागातील अभंगाचाच अर्थ गद्यातील प्रार्थनेच्या पहिल्या भागात अधिक विस्ताराने आला आहे. वर्षारंभाच्या उपासनेत हा अभंग म्हणत नसल्याने त्यावेळी गद्यातील पहिल्या भागाचे चिंतन करणे जास्त महत्त्वाचे आहे. वर्षान्ताला गद्यातील प्रार्थनेच्या शेवटच्या तीन परिच्छेदांवर जास्त लक्ष केन्द्रित करवयाचा उपयोग आहे. वर्षान्ताला कोणी पाहुणे किंवा अध्यक्ष बोलवायचे असतील तर ते सुद्धा हे शेवटचे तीन परिच्छेद जगण्याचा प्रयत्न करणारे असावेत.

या तीन परिच्छेदांमध्ये राष्ट्रकल्याण, धर्मसेवा आणि ईशसेवा या कामांसाठी आपली सर्व शक्ती वापरली जावी अशी प्रार्थना आहे. राष्ट्रकल्याणाचे काम म्हणजे भौतिक, आर्थिक, राजकीय सुधारणा आणि समाजातील नीतिमत्तेची वाढ करणे. धर्मसेवा आणि ईश्वरसेवा म्हणजे सुधारणा आणि नीतिमत्तेची वाढ या पलिकडच्या मानवी विकासाचे काम करणे. या दोन्हीपैकी बहुतेकांना व्यक्तिशः कोणते तरी एकच काम आदर्श म्हणून स्वीकारावेसे वाटते. पण संघटना म्हणून, किंवा समाज म्हणून हे दोन्ही आदर्श आपल्या समोर सतत असायला हवेत. वर्षान्ताच्या दिवशी या दोन प्रकारच्या आदर्शांची उजळणी आपण करायला हवी.

खाली दोन्हीपैकी कोणतेतरी एक काम करणाऱ्या आदर्श व्यक्तींची काही नावे उदाहरणादाखल दिली आहेत. ही यादी परिपूर्ण नाही. नमुना यादी आहे. या यादीतल्या सारख्या किंवा त्यांच्या परंपरेतील एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचा परिचय वर्षान्ताच्या दिवशी करून घ्यावा. त्यांच्याशी संबंधित स्थाने बघण्याची, त्यांचा वारसा सांगणारी कामे बघण्याची योजना नव्या वर्षारंभापर्यंतच्या काळात करावी. त्यांच्यासारखे काम करण्याची काही योजना करावी.

**राष्ट्रकल्याण, धर्मसेवा आणि ईशसेवेसाठी जगणारे राष्ट्रधर्मप्रणेते**

| **१८ व्या शतकापर्यंत होऊन गेलेले** | **१९ वे शतक ते स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत कार्यरत असलेले** | **२० व्या शतकाच्या उत्तरार्धातही कार्यरत असलेले** |
|---|---|---|
| १. श्रीकृष्ण | १. दयानंद | १. माताजी |
| २. महावीर | २. महात्मा फुले | २. पंडित जवाहरलाल नेहरू |
| ३. गौतम बुद्ध | ३. विवेकानंद | ३. विनोबा |
| ४. चाणक्य | ४. जमशेदजी टाटा | ४. गोळवलकर गुरुजी |
| ५. शंकराचार्य | ५. लोकमान्य टिळक | ५. स्वामी रंगनाथानंद |
| ६. बसवेश्वर | ६. जगदीशचन्द्र बसू | ६. डॉ. होमी भाभा |
| ७. विद्यारण्य | ७. अरविंद | ७. लाल बहादूर शास्त्री |
| ८. राणा प्रताप | ८. निवेदिता | ८. लक्ष्मीबाई (मावशी) केळकर |
| ९. रामदास | ९. गांधीजी | ९. चिन्मयानंद |
| १०. शिवाजी महाराज | १०. सावरकर | १०. बाळासाहेब देवरस |
| ११. गुरु गोविंदसिंह | ११. डॉ. हेडगेवार | ११. पांडुरंगशास्त्री आठवले |
| १२. अहिल्याबाई | १२. डॉ. आंबेडकर | १२. डॉ. वि. वि. पेंडसे |

गद्य प्रार्थनेच्या शेवटच्या तीन परिच्छेदात राष्ट्रकल्याण या ध्येयाचा उल्लेख आहे. व्यक्तिगत संसार करूनही राष्ट्रकल्याणाला प्राधान्य देणारे लोक इतिहास आणि संस्कृती घडवितात. प्रभू रामचंद्र आणि शिवाजी महाराज हे याची उदाहरणे आहेत. संसार करूनही राष्ट्रकल्याणाला प्राधान्य देणाऱ्यांना आई आणि पत्नीची साथ असते. आधुनिक काळात असेच काम करणाऱ्या स्त्रियांना वडील आणि पतीची साथ असायला लागेल.

इतिहास आणि संस्कृतीला तत्त्वाज्ञानाचा आधार असतो. इतिहास किंवा सुधारणा घडविणाऱ्यांना तत्त्वज्ञान निर्माण करायला उसंत नसते. ते संस्कृतीमध्ये गुंफलेले तत्त्वज्ञान गृहीत धरतात. परंतु संस्कृती निर्माण करणाऱ्यांना किंवा समाजाचे मन घडविणाऱ्यांना, तत्त्वज्ञनातही भर घालावी लागते. तत्त्वज्ञानाला वाहून घेणारे व्यक्तिगत संसाराच्या पलिकडे जातात. परंतु राष्ट्राच्या संसाराला ते सोडू शकत नाहीत. त्यांचे तत्त्वज्ञान निर्मितीचे कार्य धर्मसेवा आणि ईश्वरसेवा या रूपाने चालते. शंकराचार्य आणि विवेकानंदांनी या प्रमाणे काम केले.

७. वर्षान्त उपासनेचा सातवा व शेवटचा भाग गायत्री मंत्राचा आहे. या दिवशी वरील दोन प्रकारच्या आदर्शांच्या प्रकाशात काम करण्याची व जगण्याची प्रेरणा आमच्या बुद्धीला मिळो या अर्थाने 'धियो यो नः प्रचोदयात्' म्हणायचे.

---